औ.प्र/मनपा/उ.अ/पा.पु/आ.क्र/८३३/२०१५
दिनांक :- २३/१२/२०१५

## बैठकीचे इतिवृत्त

| | |
|---|---|
| प्रकल्प | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना:- समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्प |
| प्राधिकरण | औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद |
| कन्सेशनर | औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लिमीटेड (ACWUCL) |
| संदर्भ | दिनांक २२ सप्टेंबर २०११ रोजी महानगरपालिका व कन्सेशनर यांचे सोबत झालेले कन्सेशन ॲग्रीमेंट |
| बैठकीचा दिनांक व वेळ | २१ नोव्हेंबर २०१५, सकाळी ११.०० वा. |
| बैठकीचे स्थळ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद |
| अध्यक्ष | आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद |

### बैठकीला खालीलप्रमाणे उपस्थिती होती

| अ.क्र. | नाव | पद आणि कंपनी |
|---|---|---|
| १. | एच.ए. कोल्हे | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| २. | के.एम. फालक | उप अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ३. | अशोक पद्मे | उप अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ४. | आय.बी. ख्वाजा | उप अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ५. | सेतु दिवेकर | महानगरपालिकेचे सल्लागार |
| ६. | नरेश नानोटकर | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| ७. | आर.बी. होनकळसे | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| ८. | विपीन हटकर | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| ९. | जय शंकर द्विवेदी | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १०. | अर्णब घोष | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| ११. | सोनल खुराणा | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १२. | रमेश सोनकांबळे | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १३. | अमीत बेरा | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १४. | आशीष पोरवाल | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १५. | संजय खडायते | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १६. | विजय दिवाण | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिति |



23/12/15

| | | |
|---|---|---|
| १७. | प्रदिप पुरंदरे | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिती |
| १८. | एच. आर. ठोलीया | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिती |
| १९. | कलिम अख्तर | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिती |
| २०. | सुभाष लोमटे | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिती |
| २१. | मनोहर टाकसाळ | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिती |
| २२. | वाहुळ | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिती |
| २३. | अनंत डी. आचार्य | सदस्य, समांतर योजना नागरी कृती समिती |
| २४. | राजेंद्र दाते पाटील | अभ्यासक, समाजसेवक, जलतज्ञ-समांतर जलवाहीनी प्रकल्प |

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तसेच महानगरपालिकेच्या वतीने समांतर जलवाहीनी प्रकल्पाची माहिती विषद करण्याबाबत सूचविले. स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी श्री. नानोटकर यांनी समांतर जलवाहीनी प्रकल्पाची तांत्रिक माहिती दिली.

यानंतर समांतर योजना नागरी कृती समितीच्या सदस्यांना त्यांच्या आक्षेपाबाबत विचारणा केली असता श्री. विजय दिवाण यांनी तत्कालीन आयुक्तांना आक्षेपाबाबत सविस्तर निवेदन दिलेले असल्याचे नमुद करुन खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविले. नोंदविलेल्या आक्षेपांवर खालीलप्रमाणे चर्चा झाली.

**१. पाणी पुरवठा स्त्रोत :**

आयुक्त यांनी औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा स्त्रोत याची माहिती घेतली व त्याचा तपशील सादर करण्यास सांगितले. समांतर योजना नागरी कृती समिती सदस्यांनी जायकवाडी जलाशयातील पाणी उपलब्धता तसेच भविष्यातील पाण्याची गरज लक्षात न घेता योजनेचे नियोजन केल्याचे चर्चेत नमूद केले असता आयुक्त यांनी जायकवाडी जलाशयाची सविस्तर माहिती, उपलब्ध पाणीसाठा, सन २०४१ साला करीता पाण्याची गरज व महानगरपालिकेचे जलाशयात असलेले आरक्षण तसेच जलाशयातील गाळ संचय याबाबत सविस्तर माहिती घेतली. औरंगाबाद महानगरपालिकेने या सर्व बाबींचा विचार प्रकल्पाचे संकल्पन करतांना केलेला असून सद्यस्थितीत महानगरपालिकेचे ११३.२८ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण मंजुर असून सन २०४१ च्या लोकसंख्ये करीता उर्वरीत ३० द.ल.घ.मी. पाणी आरक्षणा करीता पाटबंधारे विभागाकडे मागणी नोंदविल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रस्तावित उद्‌भव विहीर ही ४५०.०० मीटर पाणी पातळीवर असल्याने मृत साठ्यातून पाणी उचलता येणार आहे, जायकवाडी जलाशयातील मृत साठा हा ७३८ द.ल.घ.मी. इतका असुन महानगरपालिकेची वार्षिक मागणी ही तुलानात्मक दृष्ट्या कमी असल्याने जायकवाडी धरणातील पाणीसाठ्याचा परिणाम योजनेवर होणार नसल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. गाळ संचयाबाबतची माहीती पाटबंधारे विभागाकडून घेण्यात आली असल्याचे नमूद केले असता याबाबत पाटबंधारे विभागाने केलेल्या गाळ सर्वेक्षणाचा अहवाल सादर करण्याच्या सुचना आयुक्त यांनी दिल्या.

**२. योजनेचे हस्तांतरण :**

राज्यघटनेच्या कलम २१ नुसार तसेच महानगरपालिका अधिनियम ६६ अ नुसार पाणी पुरवठा करणे ही स्वायत्ता संस्थेची जबाबदारी असल्याने महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजनेचे खाजगी अभिकर्त्यास केलेले

हस्तांतरण बेकायदेशीर असल्याचे समिती सदस्यांनी नमुद केले. यावर पाणी पुरवठ्याची जबाबदारी जरी महानगरपालिकेची असली तरी ती जबाबदारी कुठल्या पध्दतीने पार पाडावी व पाणी पुरवठा कसा करावा हे ठरविण्याचा अधिकार महानगरपालिकेला असल्याचे आयुक्त यांनी स्पष्ट केले.

**३. नविन संतुलन जलकुंभ:**

पीपीपी योजनेमध्ये नक्षत्रवाडी येथील डोंगरावर १० दलली क्षमतेचा संतुलन जलकुंभ प्रस्तावित करण्यात आलेला आहे. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेअंतर्गत बांधलेले संतुलन जलकुंभ पुर्ण क्षमतेने भरत नसल्याने नवीन संतुलन जलकुंभाची आवश्यकता नसल्याचे समिती सदस्य श्री. एच. आर. ठोलिया यांनी सांगितले. यावर आयुक्त यांनी समिती सदस्य श्री.एच.आर.ठोलीया यांना तांत्रिक दृष्ट्या संतुलन जलकुंभाची आवश्यकता व त्यांचे संकल्पन याबाबत आपण अभ्यास केला काय अशी विचारणा केली असता संबंधितांनी संतुलन जलकुंभाची गरज नाही असे माझे मत आहे असे सांगितले. यावर संतुलन जलकुंभाची संकल्पना, आवश्यकता, अस्तित्वातील वितरण प्रणाली आणि प्रस्तावीत वितरण व्यवस्थेचे हायड्रॉलीक मॉडेल याबाबत महानगरपालिकेतर्फे सविस्तर माहीती देण्यात आली. प्रस्तावीत संतुलन जलकुंभाची गरज, सविस्तर संकल्पन याबाबी सादर करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले. तसेच समांतर योजना नागरी कृती समिती सदस्यांनी योजनेचा परिपुर्ण अभ्यास करावा व त्यानंतरच आपली मते मांडावीत असेही आयुक्त यांनी स्पष्ट केले.

अस्तित्वातील २६ जलकुंभ आणि प्रस्तावीत ४१ जलकुंभ योजनेत समाविष्ट केलेले आहेत. यावर समांतर योजना नागरी कृती समिती सदस्यांनी आक्षेप घेऊन मुळ योजनेतील ११ जलकुंभांद्वारेच संपूर्ण शहराला पाणी पुरवठा करता येईल असे सुचविले. यावर सुधारीत हायड्रॉलीक मॉडेल कन्सेशनरमार्फत अद्याप प्राप्त झाले नसल्याचे स्वतंत्र अभियंता यांच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणून दिले. तथापि निविदेतील अटी व शर्तीनुसार तसेच महानगरपालिका क्षेत्राची व्याप्ती लक्षात घेता नविन जलकुंभांची संख्या वाढणार असल्याचे नमुद केले. यावर शहराची भविष्याची गरज, अस्तित्वातील जलकुंभांचे आयुर्मान, शहरातील गुंठेवारी व इतर अनधिकृत वसाहतींना पाणी पुरवठा करणे इत्यादी बाबींचा विचार करुन जलकुंभांबाबतचा निर्णय घ्यावा तसेच अस्तित्वातील व प्रस्तावित जलकुंभाची सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले. त्याचप्रमाणे प्रस्तावित जलकुंभांसाठी आवश्यक असणाऱ्या जागेच्या उपलब्धतेची कार्यवाही त्वरीत करावी असे निर्देश दिले.

**४. निविदा प्रक्रिया :**

समांतर योजना नागरी कृती समिती सदस्यांनी निविदा प्रक्रियेबाबतची माहिती आयुक्त यांना विषद केली. यात RFQ व RFP बाबत माहिती देवून RFQ मध्ये ९ निविदाधारक पात्र असतांना RFP करीता फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या, प्राप्त दोन निविदांवरच महानगरपालिकेने निविदा अंतीम केली. शासन निर्णयानुसार कमीत कमी तीन निविदा आवश्यक असून या प्रकरणात महानगरपालिकेने फेर निविदा न करता निविदा अंतिम केल्याचा आक्षेप घेतला. आयुक्त यांनी समांतर योजना पीपीपी प्रकल्पाची संपुर्ण निविदा प्रक्रिया, RFQ व RFP इत्यादी बाबींचा सखोल अभ्यास करुन निविदा प्रक्रिये बाबत निर्णय घेण्याचे आश्वासीत केले.

**५. कंत्राटदाराचा काळ्या यादीत समावेश व भागीदारातील बदल :**

निविदा दाखल करणाऱ्या SPML कंपनीस उत्तर प्रदेश जलनिगम मार्फत काळ्या यादीत टाकण्यात आल्याचा आक्षेप समांतर योजना नागरी कृती समिती सदस्यांनी नोंदविला. त्याचप्रमाणे काकडे इन्फ्रास्ट्रक्चर ही कंपनी RFQ मध्ये दुसऱ्या कंपनीसोबत असतांनाही SPML कंपनीने निविदा कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर या



22/12/15

प्रकल्पासाठी Special Purpose Vehicle (SPV) करतांना काकडे इन्फ्रास्ट्रक्चरचा समावेश केला असल्याचेही आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले असता याबाबत संपुर्ण माहिती व निविदा प्रक्रिया तसेच निविदा दस्तांवेजांची तपासणी करण्यात येईल असे आयुक्त यांनी स्पष्ट केले.

**६. निविदा किंमतीमध्ये झालेली वाढ :**

महानगरपालिकेने सन २००६ मध्ये रुपये ३५९.६७ कोटी रकमेचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सन २००९ मध्ये या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली. महानगरपालिकेने सन २००९ ते सन २०११ पर्यंत निविदा प्रक्रिया पार पाडली. या प्रक्रियेअंतर्गत PPP मॉडेल तयार करुन रुपये ७९२.२० कोटी रकमेची निविदा केली. मुळ मंजुर प्रकल्पाच्या किमतीपेक्षा पीपीपी योजनेमध्ये जास्त किंमतीची निविदा प्रक्रिया झाल्याने त्याचा भार शहरवासीयांवर पडणार असल्याचा आक्षेप समांतर योजना नागरी कृती समिती सदस्यांनी नोंदविला. त्याचप्रमाणे महानगरपालिकेला शासन अनुदानाचा मिळालेला पहिला हप्ता, त्यावर महानगरपालिकेला मिळालेले व्याज, समांतर जलवाहीनी करीता महानगरपालिकेने घेतलेले कर्ज, शासनाकडून भविष्यात मिळणारे उर्वरीत अनुदान या बाबींचा विचार करता महानगरपालिका ही योजना स्वबळावर राबवू शकली असती असाही आक्षेप समिती सदस्यांनी नोंदविला. यावर सविस्तर चर्चा होऊन सामान्य भाषेत व सर्व सामान्य नागरीकांना समजेल अशा पध्दतीने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्तांनी निर्देश दिले. त्याचप्रमाणे मुळ मंजुर प्रस्तावापेक्षा पीपीपी योजनेच्या किंमतीमध्ये जास्तीची झालेली वाढ ही दरसुचीतील बदल, काही उपांगांच्या बाबींमध्ये झालेली वाढ, नविन समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी यामुळे देखील होऊ शकते असे आयुक्त यांनी स्पष्ट केले. तथापि मुळ मंजुर प्रस्तावात समाविष्ट बाबी, पीपीपी योजनेच्या निविदा किंमतीत समाविष्ट असलेल्या बाबी, दरसुची इत्यादी बाबींचा सविस्तर अहवाल घेण्यात येईल, सर्व बाबी तपासण्यात येतील, कंपनीने सादर केलेले Financial model देखील तपासण्यात येईल असे आयुक्त यांनी स्पष्ट केले. निविदा प्रक्रियेत कंपनीस AOSG पोटी द्यावयाची रक्कम कुठल्या आधारे ठरविण्यात आली, त्याचप्रमाणे दरवर्षी देण्यात येणारी राहा टक्के वाढ कुठल्या आधारे ठरविण्यात आली याचीही तपासणी करण्यात येईल असेही आयुक्त यांनी स्पष्ट केले.

**७. पाणीपट्टी दरवाढ :**

योजनेची प्रत्यक्ष कामे संथ गतीने सुरु आहेत, शहरात दोन दिवसाआड पाणी पुरवठा होत असतांनाही प्रत्येक वर्षी १०% पाणीपट्टी दरवाढ करण्यात येत आहे आणि AOSG ची रक्कम प्रतिवर्ष ६% वाढविण्यात येत असतांना पाणीपट्टीत १०% दरवाढ कशाकरीता असा आक्षेप समिती सदस्यांनी नोंदविला. यावर पाणीपट्टीचे दर हे पाण्याच्या उत्पादन खर्चाशी निगडीत असल्याचे आयुक्त यांनी स्पष्ट केले. तथापि पाणीपट्टी दरवाढी बाबत गृहीत धरलेल्या बाबींची तपासणी केली जाईल. याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याच्या सुचना आयुक्तांनी दिल्या.

**८. जलमापक यंत्र (Water meter) :**

सद्यस्थितीत शहरास दोन दिवसाआड पाणी पुरवठा होत असल्याने शहरातील नळजोडण्यांना पाण्याचे मीटर बसविण्याची सक्ती करु नये असे आयुक्त यांनी निर्देश दिले असता मा. सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार सद्यस्थितीत अस्तित्वातील नळजोडण्यांना मीटर बसविण्याचे तात्पुरते थांबविण्यात आले असल्याचे महानगरपालिकेच्या वतीने निदर्शनास आणून दिले.

२४/१२/१५

९. **DI / HDPE पाईपचा वापर :**

योजनेच्या मुळ प्रस्तावात DI पाईपचा समावेश असतांना कंपनीच्या फायद्याकरीता HDPE पाईप वापरण्यास मान्यता दिल्याचा आक्षेपही समितीने नोंदविला. याबाबतीत केलेल्या कार्यवाहीचा सखोल अभ्यास व तपासणी करण्याबाबत आयुक्त यांनी आश्वासीत केले.

राजेंद्र दाते पाटील यांनी शासनाच्या निर्देशाचे पालन केले नाही, ज्या कंपनीने निविदा दाखल केली त्या कंपनी समवेत करारनामा केला नाही, तसेच मुख्य निविदाधारकाचे ५१% भाग भांडवल नसल्याचे सांगितले असता लेखी स्वरुपात आक्षेप नोंदविण्याबाबत व आक्षेपांवर सविस्तर माहिती देण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले.

समांतर जलवाहीनी प्रकल्पा संदर्भाने सुरु झालेली चर्चा /बातम्या तसेच सद्यस्थिती नागरिकांसमोर यावी याकरीता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. महानगरपालिकेने प्रकल्पाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता ठेवावी, सर्व माहीती जनतेकरीता उपलब्ध करुन द्यावी तसेच समांतर योजना नागरी कृती समिति सदस्यांनी सखोल अभ्यास करुन आपली मते मांडावीत जेणे करुन नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही अशी अपेक्षा आयुक्त यांनी व्यक्त केली.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

O/C

आयुक्त 23/12/15
महानगरपालिका औरंगाबाद